THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 23RD APRIL 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट नामदार जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे:—

### सन १८९६ चा आक्ट ५ वा.

**सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.**

ज्याअर्थीं सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट सुधारणें इष्ट आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदरहू आक्टाच्या ३ ऱ्या कलमांत "मद्रास किंवा मुंबई इलाक्याच्या गव्हर्नर इन् कौन्सिलांनीं ब्रिटिश इंडियांतील" या शब्दांबदल, "कोणत्याही स्थानिक सरकारानें हिंदुस्थान सरकारच्या किंवा त्या स्थानिक सरकारच्या" हे शब्द दाखल करावे. सन १८७९ चा आक्ट २१, याच्या ३ ऱ्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू आक्टाच्या ११ व्या कलमांत शेवटीं खालील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:— सन १८७९ चा आक्ट २१, ह्याच्या ११ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"इंपीरियल सर्व्हिस ट्रूप नामक लष्कराच्या कोणत्याही तुकडींतून फरारी होणें ह्यास अपराध समजलें पाहिजे, आणि त्या अपराधाच्या संबंधानें, ते ट्रूप ज्या संस्थानाचे असतील त्या संस्थानाच्या पोलिटिकल एजंटास ह्या कलमाअन्वयें वारंट करतां येईल.

३. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमांत, "आणि आरोपित मनुष्यास धरल्यावर," ह्या शब्दांनंतर, "त्याला लगतच्या पुढल्या कलमाच्या ठरावांबरहुकुम जामिनावर न सोडल्यास," हे शब्द दाखल करावे. सन १८७९ चा आक्ट २१, ह्याच्या १२ व्या कलमाची सुधारणा.

४. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमानंतर खालील कलमें दाखल करावीं. तीं येणेंप्रमाणें:— सन १८७९ चा आक्ट २१, ह्याच्या १२ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करणें.

तारण घेण्याविषयीं हुकुम करण्याचा पोलिटिकल एजंटास अधिकार आणि नंतर काम चालविण्याची रीत.

"१२ अ. कलम ११ अन्वयें कोणत्याही मनुष्यास धरण्यासाठीं वारंट करणाऱ्या पोलिटिकल एजंटास, त्याच्या नजरेस येईल तर, त्या वारंटावर शेरा लिहून असा हुकुम करतां येईल कीं, त्या वारंटांत सांगितलेल्या अमलदारासमोर निर्दिष्ट केलेल्या वेळीं हजर होण्याबद्दल त्या मनुष्यानें पुरेशा जामिनांनिशीं खत करून दिलें तर, तें वारंट ज्या माजिस्त्रेटाच्या नांवाचें असेल त्यानें असें तारण घेऊन त्या मनुष्यास कैदेंतून सोडून दिलें पाहिजे.

"सदरहू शेऱ्यांत, (अ) जामीन घ्यावयाचे असल्यास त्यांची संख्या, (ब) ते जामीन व ज्या मनुष्यास धरण्यासाठीं तें वारंट केलेलें असेल तो मनुष्य ह्यांस किती किती रकमेबद्दल बांधून घ्यावयाचें तें, आणि (क) वारंटांत सांगितलेल्या अमलदारासमोर त्या मनुष्यास ज्या वेळीं व जागीं हजर होण्याचें असेल ती वेळ व जागा, ह्या गोष्टी लिहिल्या पाहिजेत.

"ह्या कलमाअन्वयें तारण घेण्यांत येईल त्या प्रत्येक प्रसंगीं त्या माजिस्त्रेटानें त्या गोष्टीबद्दलचा दाखला, तें वारंट ज्या पोलिटिकल एजंटानें केलें असेल त्याकडे पाठवून खत आपल्याजवळ ठेविलें पाहिजे.

हजर होण्याबद्दलच्या खताचा भंग झाला असतां धरणें.

"१२ ब. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें करून दिलेल्या कोणत्याही खतांत सांगितलेल्या अमलदारासमोर हजर होण्यास त्यावरून बांधिलेला मनुष्य त्याप्रमाणें हजर झाला नाहीं तर, त्या मनुष्याच्या कसुरीबद्दल त्या माजिस्त्रेटाची खात्री झाल्यास त्याला, त्या मनुष्यास पुनः धरून सदरहू अमलदाराच्या स्वाधीन करण्याबद्दल वारंट करतां येईल.

सन १८८२ चा आक्ट १०, याचीं कलमें ५१३ व ५१४ ही लागू करणें.

"१२ क. वरील ठरावांअन्वयें जें खत करून देण्याविषयीं फर्माविलें असेल अगर जें खत करून दिलेलें असेल त्या प्रत्येक खताच्या बाबतींत त्या माजिस्त्रेटास, ज्या कोर्टानें खत करून देण्याविषयीं फर्माविलें असेल, किंवा खत घेतलें असेल त्या कोर्टास, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, ह्याच्या ५१३ व्या व ५१४ व्या कलमांत दिलेले अधिकार चालवितां येतील."

सन १८७९ चा आक्ट २१, याच्या १३ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

५. सदरहू आक्टाच्या १३ व्या कलमांत, "इन्साफ करण्यासाठीं त्यांच्या" या शब्दांबद्दल खालील मजकूर दाखल करावा तो येणेंप्रमाणें:—

"किंवा फरारी होणाऱ्या मनुष्याच्या बाबतींत, योग्य रीतीनें रचना झालेल्या लष्करी कोर्टानें इन्साफ करण्यासाठीं."

सन १८७९ चा आक्ट २१, याच्या १७ व्या कलमानंतर नवीन कलम जास्त दाखल करणें.

६. सदरहू आक्टाच्या १७ व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

सन १८८२ चा आक्ट १०, कलम ५४, रकम सातवें, याअन्वयें धरलेल्या मनुष्यांस अटकावून ठेवणें.

"१७ अ. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा यांत कोणताही ठराव असला, तथापि सदरहू कायद्याचें कलम ५४, रकम, सातवें, यांतील ठरावांअन्वयें, माजिस्त्रेटाच्या हुकुमावांचून व वारंटावांचून धरलेल्या कोणत्याही मनुष्यास, ज्या माजिस्त्रेटाच्या हुकुमतीच्या स्थलसीमेच्या आंत त्याला धरलें असेल त्या माजिस्त्रेटाच्या हुकुमाअन्वयें, ह्या आक्टाच्या १५ व्या कलमाअन्वयें अशा माजिस्त्रेटानें केलेल्या वारंटावरून धरलेल्या मनुष्यास ज्या रीतीनें व ज्या इयत्तांस पात्र राहून अटकावून ठेवतां येतें, त्याच रीतीनें व त्याच इयत्तांस पात्र राहून अटकावून ठेवतां येईल."

एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजाह् गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ५ माहे मार्च सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९६ चा आक्ट ९ वा.

सन १८९० चा हिंदुस्थानचा रेल्वेंबाबद आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.

ज्याअर्थीं सन १८९० चा हिंदुस्थानचा रेल्वेंबाबद आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम, ७ ह्याची सुधारणा.

१. सदर्हू आक्टाचें कलम ७, पोटकलम (१), रकम (अ), ह्यांत, "सडका" हा शब्द दुसऱ्यानदां येतो त्यानंतर "रेल्वेच्या लैनी" हे शब्द जास्त दाखल करावे.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम १०, पोटकलम (२), ह्याची सुधारणा.

२. सदर्हू आक्टाचें कलम १०, पोट कलम (२), ह्यांत, "होईल तेथवर" ह्यानंतरचा त्या पोटकलमाचा जो भाग आहे त्याच्या ऐवजीं, खालील मजकुर दाखल करावा : तो येणेंप्रमाणें:—

"सन १८९४ चा जमीन घेण्याविषयींचा आक्ट, कलमें ११ ते १९ (दोन्ही धरून), कलमें १८ ते ३४ (दोन्ही धरून) व कलमें ५३ आणि ५४ यांतील ठरावांअन्वयें ठरविली जाऊन अदा केली जाईल; आणि मोबदल्याच्या निवाड्यास त्या आक्टाच्या ५१ व्या व ५२ व्या कलमांतील ठराव लागू राहतील."

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम ५९, पोटकलम (३), ह्याची सुधारणा.

३. सदर्हू आक्टाचें कलम ५९, पोटकलम (३), ह्यांत, "पोटकलम (१)" ह्याच्या बदला "पोटकलम (२)" असें दाखल करावें.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम ७३, पोटकलम (१), ह्याची सुधारणा.

४. सदर्हू आक्टाचें कलम ७३, पोटकलम (१), ह्यांत, "उंटांच्या" ह्या शब्दाच्या आधीं "खेचरांच्या" हा शब्द दाखल करावा; आणि "मेंढ्या" ह्या शब्दाच्या आधीं "गाढवें" हा शब्द दाखल करावा.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम ८१, हें रद्द करणें.

५. सदर्हू आक्टाचें कलम ८१ हें रद्द केलें आहे.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम ११४, ह्याची सुधारणा.

६. सदर्हू आक्टाचें कलम ११४ ह्यांत, "येण्याच्या अर्धानें" ह्या शब्दांच्या बदला "कोणत्याही अर्धानें" हे शब्द दाखल करावे; आणि "जो रिटर्न [परत] प्रवास" ह्या शब्दांच्या बदला "जो प्रवास" हे शब्द दाखल करावे.

सन १८९० चा आक्ट ९ वा, कलम १३६, पोटकलम (१), ह्याची सुधारणा.

७. सदरहू आक्टाचें कलम १३६, पोटकलम (१) ह्यांत, "कोर्टांच्या" ह्या शब्दानंतर "अगर ज्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यास किंवा मनुष्यास मिळकत जप्त करण्याचा अगर अटकावून ठेवण्याचा किंवा ती हुकुमनाम्याच्या बजावणींत इतर रीतीनें जप्त करवण्याचा कायद्यावरून अधिकार असेल, त्या अधिकाऱ्याच्या अगर मनुष्याच्या" हा मजकुर जास्त दाखल करावा.

(सही) एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# ERRATUM.

## शुद्धिपत्र.

"सन १८९६ चा मुंबईचा आक्ट १ ला" ह्मणून प्रसिद्ध झालेल्या मुंबईच्या आक्टांत, "सन १८९६ चा मुंबईचा आक्ट १ ला" ह्या शब्दांच्या व अंकांच्या बदला "सन १८९९ चा मुंबईचा आक्ट ३ रा" हे शब्द व अंक दाखल करून त्या आक्टाच्या इंग्रजी सदरांतही तसाच फेरफार करावा; आणि त्या आक्टाच्या पहिल्या कलमांत "१८९६" ह्या अंकांच्या बदला "१८९९" हे अंक दाखल करावे.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.